# महाराष्ट्राचा दैदीप्यमान शाहीर 'प्रल्हादराय जामखेडकर'

पोवाडा हा वाङ्मय प्रकार महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाचा अविभाज्य भाग आहे. अज्ञानदास, तुळशीदास, यमाजी भास्कर हे शिवशाहीतले तीन शाहीर ज्ञात आहेत. पेशवाईत पंचविसाहून अधिक आणि स्वातंत्र्यपूर्व काळात अंदाजे २५ प्रसिध्द शाहीर झाले. राव बर्वे यांचा ब्रिटिशांविरुध्दचा पोवाडा १४ एप्रिल १८५१ च्या 'ज्ञानप्रकाशा'त प्रसिध्द झाला. महात्मा ज्योतिबा फुले यानी १८७० साली 'शिवाजीचा पोवाडा' लिहिला. 'इतिहासप्रसिध्द पुरुषांचे व स्त्रियांचे पोवाडे' हे पुस्तक हॅरी आर्बथनॉट आक्वर्थ आणि शंकर तुकाराम शाळिग्राम यानी १८९१ मध्ये मुंबईत छापल्यामुळे 'वाणीतले लेखणी'त आले. कविभूषण शाहीर प्रल्हादराय जामखेडकर यांचा जन्म ६ मे १८९१ रोजी नासिक येथे झाला. या वर्षी पोवाड्यांची ग्रांथिक शताब्दी आहे तशीच मराठी शाहिराची जन्मशताब्दी साजरी होण्याचा पहिला मान प्रल्हादराय जामखेडकर याना मिळाला. महाराष्ट्राच्या दैदिप्यमान शाहिरी मालिकेत प्रल्हादरायाना मानाचं स्थान आहे.



2

मराठी शाहिरीत प्रल्हादरायांनी मौलिक भर घातली. पोवाड्यांना त्यानी नवे वळण दिले. लेखक, रचनाकार, गायक, संशोधक, आधुनिकीकरण अशा पोवाड्यांच्या विविध क्षेत्रात त्यानी भरीव कामगिरी केली. त्यानी २६ पोवाडे व कवने प्रकाशित केली. अप्रकाशित ४० पोवाडे आहेत. त्यात दोन हिंदी व एक गुजराथी आहे. शंभर चालींची नोटेशन आहेत. त्या वेळच्या साहित्यिकांनी आणि वृत्तपत्रांनी त्यांच्या कार्याची दखल घेतली. शंकराचार्यांनी 'कविभूषण' हा मान देऊन १९४५ साली त्यांचा गौरव केला

शिवकालातील ३-४, शाहूकालातील ५-६, पेशवेकालातील १५०, इंग्रजी अमदानीतले सुमारे १५० पोवाडे उपलब्ध आहेत. या शतकातल्या पोवाड्यांची संख्या हजारापर्यंत असावी, असा अंदाज आहे. ऑक्वर्थ आणि शालिग्राम यांच्या प्रेरणेने गोविंद बल्लाळ शितूत,

# 'त्यांना काही सांगायचंय !'

बाळकृष्ण आत्माराम गुप्ते, प्रभृतीनी पोवाड्यांचे ग्रंथ प्रकाशित केले. य. न. केळकर यानी पोवाड्यांचे तीन खंड प्रसिध्द करून प्रचंड काम केले.

पोवाड्यांचे महत्त्व अनेक दृष्टीने आहे. इतिहासाचे साधन म्हणून पोवाड्यांना महत्त्व आहे. मनोरंजनाचे, प्रचाराचे आणि शिक्षणाचे साधन म्हणून पोवाडे महत्त्वाचे आहेत. पोवाड्यात तत्कालीन समाजाचे आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक दर्शन घडते. पोवाडे सर्वधर्मसमभावाचं उत्तम प्रतिक मानावं लागेल. हिंदूंच्या बरोबरीने मुसलमानानीही शाहिरी वाङ्मयात भर घालून ते समृध्द केलं आहे.

अशा या शाहिरी परंपरेतले थोर शाहीर प्रल्हादराय जामखेडकर यानी १९२७ साली लोकमान्य मेळा काढला. नाशकात त्यावेळी तो सर्वोत्कृष्ट समजला जात होता. त्या मेळ्याने त्या काळात अनेक स्पर्धा जिंकल्या. त्यानी उत्कृष्ट आणि सुसज्ज असा शाहिरी संच उभा केला. स्वत: रचलेले पोवाडे नवनव्या चालीनी नटवून खड्या, आवेशपूर्ण आवाजात सादर केले आणि रसिकांची मने जिंकली

अशा या शाहिराचा जन्मशताब्दी साजरी करण्यासाठी शाहीर वसंतराय नानिवडेकर आणि लोकशाहीर सदानंद दीक्षित कानेटकर यानी पुढाकार घेऊन डिसेंबर १९९० मध्ये कविभूषण महाराष्ट्र शाहीर प्रल्हादराय जामखेडकर जन्मशताब्दी समिती स्थापन केली. (पत्ता - डी-१/८०/७९६, एम.आय.जी. कॉलनी, वांद्रे - पूर्व, मुंबई-४०० ०५१, टेलिफोन ६४२२६२९. नानिवडेकर शाहिरी संगम या संस्थेचे सहकार्य या समितीला मिळत आहे.

या समितीतर्फे ६ मे १९९१ रोजी आकाशवाणीवर प्रल्हादरायांचे जीवन व कार्य विषद करून सांगणारा खास कार्यक्रम नाविन्यपूर्णरीतीने साजरा करण्यात आला. तर पोवाडे आणि प्रल्हादराय यांच्याविषयी मौलिक माहिती सादर करणारा कार्यक्रम १० सप्टेंबर १९९१ रोजी दूरदर्शनवर झाला. तसेच नासिक या प्रल्हादरायांच्या जन्मगावी लोकहितवादी मंडळातर्फे त्यांचे पुण्यस्मरण करणारा विशेष कार्यक्रम १७ मे १९९१ रोजी पेश करण्यात आला. जव्हार, पुणे, अंमलनेर, अहमदाबाद, बडोदे इत्यादी ठिकाणी नोव्हेंबर १९९१ पासून मे १९९२ पर्यंत विविध कार्यक्रम होणार आहेत.

कविभूषण प्रल्हादराय यांचे समग्र वाङ्मय प्रकाशित करण्यासाठी प्रभाकर जामखेडकर, विनायक जामखेडकर, वसंतराय नानिवडेकर, प्रज्ञा कुळकर्णी यांच्या संपादक मंडळाने हस्तलिखित प्रत तयार केली आहे. प्रकाशनासाठी अंदाजे ६० हजार रुपये खर्च येईल, असा अंदाज असून अनुदानासाठी ही प्रत साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष प्रा. य. दि. फडके याना सादर करण्यात आली आहे. श्री. प्रभाकर जामखेडकर यानी ही माहिती सांगितली.

जन्मशताब्दी समिती आणखी कोणता उपक्रम हाती घेणार, असे विचारता श्री. प्रभाकर जामखेडकर म्हणाले, की आकाशवाणीचे संचालक श्री. मधुकर गायकवाड यांच्या चालनेने महाराष्ट्रातल्या सर्व शाहिरांच्या पोवाड्यांचे संरक्षण, संवर्धन, ध्वनिमुद्रण करण्याचा प्रकल्प सुचवण्यात आला आहे. त्याच्या अंमलबजावणीची जबाबदारी माझ्यावर सोपविण्यात आली आहे. मी ती मान्य केली आहे.

सध्या महाराष्ट्रात प्रख्यात असे २५ शाहीर आहेत. त्यानी म्हटलेले ५० पोवाडे 'कॉम्पॅक्ट डिस्क'वर ध्वनिमुद्रित करण्यात येतील. त्यानंतर दुसऱ्या टप्प्यात उत्कृष्ट पोवाडे गायक शोधून शिवशाहीपासून आजपर्यंत उत्कृष्ट असे ५० पोवाडे ध्वनिमुद्रित करण्यात येतील. अज्ञानदासाचा तानाजीचा पोवाडा, महात्मा फुल्यांचा शिवाजी महाराजांचा पोवाडा ध्वनिमुद्रित करून 'लेखणीतलं वाणी'त आणण्यात येईल. त्यामुळे पोवाड्यांचं हे धन कायमस्वरूपी संग्रहित होईल. त्यासाठी शाहिरांना खास प्रशिक्षण देण्याकरिता डिसेंबर-जानेवारी १९९२ मध्ये नेहरू सेंटरमध्ये प्रात्यक्षिकांसह चर्चासत्र आयोजित करण्यात येणार आहे.

प्रभाकर जामखेडकर यानी तयार केलेल्या अभ्यासक्रमानुसार प्रारंभिकपासून पदव्युत्तर शिक्षणापर्यंत वर्ग चालविण्याची योजना आहे. शाहिरांचा अखिल भारतीय मेळावा मे-जून १९९२ मध्ये आयोजित करण्यात येणार आहे. महाराष्ट्रातील सर्व नामवंत शाहिरांचे कार्यक्रम, चर्चासत्रे, शिबिरे आयोजित करण्याचे उद्दिष्ट आहे. पोवाड्यांचा इतिहास, प्रल्हादरायांची कामगिरी विशद करणारा दीड तासाचा नासिक येथे जो कार्यक्रम झाला त्याची व्हिडिओ कॅसेट ठिकठिकाणी दाखविण्याचा विचार असून त्याला उत्तम प्रतिसाद मिळत असल्याचे जन्मशताब्दी समितीच्या सभासदांचे म्हणणे आहे.

(तरुण भारत) — गो. आ. भट